Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


February-2018

SPECIAL ISSUE-XXXVII

# Indian Literature and Society

## भारतीय साहित्य और समाज

## भारतीय साहित्य आणि समाज



**Guest Editor :**
Dr. D. F. Shirude
Principal
M.G.V.'s S.P.H. Arts, Science & Commerce College, Nampur, Tal. Baglan, Dist.-Nashik

**Executive Editor :**
Prof.C. R. Patil (English)
Prof.R. P. Thakare (Hindi)
Prof.Sunil Jadhav (Marathi)

**Chief Editor :**
Dr. Dhanraj Dhangar

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 51 | 'अन्या से अनन्या' में स्त्री-विमर्श | प्रा.अनिता कुंभार्डे, डॉ.अनिता नेरे | 201 |
| 52 | हिंदी के आँचिल उपन्यासों में अभिव्यक्त नारी चेतना | प्रा. योगिता उशिर | 205 |
| 53 | आज के जन जीवन में साहित्य ओर पत्रकारिता का महत्व | प्रा.सौ.सुरेखा भामरे | 209 |
| 54 | माचवी बोली के लोकसाहित्य, लोक जीवन की सांस्कृतीक पृष्ठभूमि | डॉ.शोभा ढाणकीकर | 215 |
| 55 | बीसवी शताब्दी के अंतिम दशक कि लेखिकाओं कि कहानियों में सामाजिक चेतना | प्रा. ममता पंजाबी | 218 |
| 56 | हिंदी पत्रकारिता और साहित्यः स्वरुप एवं विवेचन | डॉ.नवनाथ गाड्रेकर | 222 |
| 57 | 'अग्निगर्भ' में भारतीय सामाजिक चित्र | डॉ.चेतनकुमार मोदी | 225 |
| 58 | जनसंचार माध्यमों में हिंदी का महत्व | डॉ.परमेश्वर काकडे | 229 |
| 59 | भारतीय साहित्य की अवधारणाः एक विचार | डॉ.जितेंद्रकुमार चौधरी | 232 |
| 60 | निर्मला पुतुलःअभिव्यक्ति का यथार्थ | प्रा.कृष्णदेव तिवारी | 236 |
| 61 | 'रश्मिरथी' में कर्ण चरित्रांकन | डॉ.पूनम बोरसे | 241 |
| 62 | कोरकू जनजाति की भाषा, संस्कृति और समाज का अध्ययन | प्रा.पन्नालाल धुर्वे | 245 |
| 63 | 'विष्णुविराट के नवगीतों में ग्राम विमर्श' | प्रा.व्ही.जी.राठोड | 249 |
| 64 | 'गोदान' के नारी-पात्रों में भारतीयता | डॉ.रुक्मणी पटेल | 253 |
| 65 | समकालीन हिंदी कहानी साहित्य में महानगर विमर्श (कमलेश्वर के कहानियों के संदर्भ में ) | डॉ. संजय दवंगे | 258 |
| 66 | भारतीय साहित्य कि अवधारणा | डॉ. मनिष पटेल | 261 |
| 67 | भारतीय साहित्य और समाज | डॉ. मुकेश वसावा | 264 |
| | **मराठी विभाग** | | |
| 68 | साहित्यातील जात, लिंग, वर्ग, वर्णाच्या भेदभावाचे प्रतिबिंब | डॉ.नवनाथ गोरे | 268 |
| 69 | महाराष्ट्रीयन समाज आणि मराठी साहित्य | डॉ.राहुल पाटील | 271 |
| 70 | दलित साहित्यातील सामाजिकता | प्रा.ए.जी.नेरकर | 278 |
| 71 | साहित्याची सामाजिकता | डॉ.स्नेहल मराठे | 281 |
| 72 | भाषा, समाज आणि संस्कृति | प्रा.गणेश अहिरे | 284 |
| 73 | समन्वयशील दत्त संप्रदायाचे वाङ्मयीन योगदान | डॉ.रविंद्र बेम्बरे | 287 |
| 74 | लोकहितवादींच्या निबंधातील सामाजिकता | प्रा.योगेश शेळके | 291 |
| 75 | समकालीन फॅशन आणि उपयोजित मराठी साहित्य | प्रा.गजानन भामरे | 294 |
| 76 | भारतीय कविता आणि सामाजिक स्थित्यंतरे | प्रा. विद्या सुर्वे -बोरसे | 297 |
| 77 | भारतीस साहित्यातील दलित साहित्याचे स्वरुप | प्रा.एस.जी.कन्नोर | 301 |



*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**

**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 47 : Indian Literature & Society
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# दलित साहित्यातील सामाजिकता

**प्रा. ए. जी. नेरकर**
मराठी विभाग प्रमुख
म. स. गा. महाविद्यालय, मालेगांव कॅम्प, मालेगांव, नाशिक

**प्रास्ताविक :**

जीवन आणि साहित्य यांचा अत्यंत जवळ संबंध असतो. कोणत्याही साहित्याच्या निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवात असतात. जीवनाच्या जडणघडणीस साहित्याचाही मोलाचा वाटा असतो. एवढे काय तर, समाज आणि संस्कृती यांच्या घडणीतही साहित्याचा वाटा असतो. साहित्याचा निर्माता असलेला लेखक किंवा कवी हा स्वतःच समाजाचा एक घटक असतो. म्हणून इतरांप्रमाणे समाजातील वैशिष्टपूर्ण परिस्थितीचा, परिवर्तनाचा, बदलाचा किंवा साचलेपणाचाही परिणाम त्याच्यावरही होत असतो. तो इतरांपेक्षा अधिकय होत असतो. तो इतरांच्या तुलनेत अधिक संवेदनशील व सर्जनशील असतो. परिणामतः प्रत्यक्ष जीवनातील स्थिती-गतीचे प्रतिबिंब त्याने निर्माण केलेल्या साहित्यात उमटते. तो त्याच्या मनात उठणारी भाववलये, विचारवलये, त्याच्या परीने त्याच्या लेखनीच्या साहाय्याने साहित्यात नोंदवित असतो. याला दलित लेखकही अपवाद असण्याचे कारण नाही. जीवनात काही प्रश्न निर्माण होतात. ते तीव्र बनत जातात. त्याची दाहकता समाजाला प्रकर्षाने जाणवते. आणि त्यातूनच चळवळ जन्मास येते.

**दलित साहित्याच्या निर्मितीमधील प्रेरणा व स्वरुप :**

दलित साहित्याच्या निर्मितीमागचा हेतू केवळ मनोरंजन करणे हा नाही. खरं तर त्याचा हेतू स्वतःला आणि स्वतःच्या समाजाला पारंपारिकतेच्या मगरमिठीतून बाजूला करणे, सोडविणे हा आहे. दलित साहित्यातून सामान्यतः भावनाभिव्यक्तीला फारसे स्थान नाही. त्यापेक्षा विचार प्रकटनाला अधिक प्राधान्य आहे. किंबहुना, हे विचारच दलित साहित्यात भावनेचे रुप धारण करतात. दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी तथागत गौतम बुध्द, महात्मा ज्योतीराव फुले, कार्ल मार्क्स आणि मुख्यते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आहेत.

बौध्द विचार हा सामाजिक क्रांतीचा आणि परिवर्तनाचा विचार आहे. बौध्द तत्वज्ञानात समतेला महत्त्व दिलेले आहे. तसेच व्यक्तीचे स्वातंत्र्य, शांती, अहिंसा आणि सत्य यांनाही महत्त्व दिलेले आहे. कार्ल मार्क्सने साम्यवादाचा पुरस्कार केला. त्यांचे मते साम्यवादामुळे समाजातील सर्व स्त्री-पुरुषांना आपला विकास साधना येतो. दलित साहित्यातून आढळून येणारा नकार आणि विद्रोह म्हणजे मार्क्सच्या आदर्श समाज व्यवस्थेच्या कल्पनांना मृत रुप देण्यासाठी चालविलेल्या संघर्षाची प्रधान सूत्रे होत. दारिद्र्य आणि भूक यांचे चित्रण दलित साहित्यात मोठया प्रमाणात येते. याला मूळ कारण म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेली मार्क्सची विचारसरणी. महात्मा ज्योतीराव फुलेंनी हिंदू धर्मातील मानसिक व सामाजिक गुलामगिरीविरुध्द बंड केले. समता, बंधुत्व यांचा त्यांनी पुरस्कार केला. दलित साहित्य हे ईश्वर, आत्मा, कर्मविषयक, अध्यात्म वर्ण आणि जातिव्यवस्था यांना नकार देते. ते हिंदू परंपरा, रुढी, वाईट चालिरिती यांच्याविरुध्द बंड पुकारते, हा विचार डॉ.बाबासाहेब आंबेकडरांच्या शिकवणुकीमधून आलेला आहे.

दलितांनी बलुतेदारी सोडून स्वातंत्र्य जीवन जगण्याचा उपदेश बाबासाहेबांनी केला. मानवमुक्ती, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यांचा पुरस्कार केला. दलितांच्या मनात आत्मसन्मान, आत्मविश्वास, आत्मावलंबन यांची जाणीव करुन दिली. परंपरा, पोथीनिष्ठता, परमेश्वरविषयीची कल्पना यांना नकार देण्यास सांगितले, जो धर्म वर्तमान समृध्द करण्यासाठी माणसाला प्रोत्साहन देतो. जो त्याच्या मनात आशा पल्लवित करतो व फुलवितो तोच खरा धर्म होय. ज्या धर्मात मानसाच्या विकासाला वाव नाही. तो धर्म नसून निव्वळ ढोंग आहे. अशी शिकवण दिली.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 47 : Indian Literature & Society
UGC Approved No. 40705 & 44117

ISSN : 2348-7143
February 2018

लोकशही, समाजवाद आणि बुध्दीविचार प्रणाली, हाच आंबेडकरी विचारांचा गाभा आहे. दलित साहित्यातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान मोठया प्रमाणात येते. समाजसुधारणा म्हणजे अस्पृश्यता नष्ट झाली असे होत नाही. केवळ समाज बदलून चालणार नाही. भौतिक सुख मिळाले म्हणजे सर्वकष परिवर्तन झाले असे होत नाही त्यासाठी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व मानसिक स्तरांवर परिवर्तन घडून येणे आवश्यक आहे. यासाठी सम्यक क्रांती व्हावी लागते. ती घडवायची असेल तर विद्रोहाची गरज आहे. म्हणून दलित साहित्य विद्रोहाची भूमिका घेते. माणसाच्या शत्रूंशी, माणसाला कमी लेखणाऱ्या व्यवस्थेविरुध्द हा विद्रोह आहे. मानवते विषयीच्या करुणेपोटी, जीवनावरील प्रेमापोटी हा विद्रोह जन्मलेला आहे. दलित साहित्य अज्ञान, दारिद्रय, पिळवणूक यांना नकार देते. वर्णव्यवस्थेमध्ये, जातिव्यवस्थेमध्ये माणसाचे अवमूल्यन होते. म्हणून या साहित्याने वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था नाकारली आणि माणूस महान आहे, हे तत्त्वज्ञान स्वीकारले. ते माणसाला केंद्रबिंदू मानते. त्याची बांधीलकी मनुष्यत्वाची प्रतिष्ठा मानणाऱ्या तत्त्वप्रणालीशी आहे.

साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध आहे. समाजनिर्मिती ही केवळ ईश्वरलीला नसून ती मानव निर्मित घटना आहे. सामाजिकतेची मानवजनित सर्व निर्मितीवर परिणाम होतो. 'तेन'च्या मते कोणतीही साहित्यकृती घेतली तरी, ती केवळ कल्पनांचा खेळ, किंवा उद्दीपित मेंदूतून निघालेली एक क्षणिक लहर असत नाही. ती लिहिणारा साहित्यिक ज्या समाजात वावरतो त्या समाजाचा, त्याच्या देशाच्या त्या देशाचा इतिहास-भूगोल संस्कृतीचा, तो लेखक ज्या काळात जगला त्या काळातील युगधर्माचा त्याच्या कृतीवर परिणाम होत असतो. हे दृश्य आपणास दलित साहित्यातूनही जाणवते.

दलित साहित्यिकांच्या दृष्टीने दलित साहित्य हा दलित जाणिवेचा अमूल्य ठेवा आहे. दलित जाणिवेची सारी दृष्टी व सृष्टी यांच्या या साहित्यात संकीर्णपणे समाविष्ट झालेली आहे. दलित मनाला जे जे दिसते, सुचते, जाणवते. हे मन जे जे भोगते, ते ते सारे या साहित्यात उत्कटपणे आणि मोकाटपणे ग्रंथित होत आले आहे. त्यामुळे हे साहित्य दलित समूह मनाचे संकीर्ण दर्शन घडविते. दलित साहित्य हा आजच्या दलित मनाचा आलेख, आरसा, दस्तऐवज, गाथा, हत्यार, निशाल बनले आहे.

RESEARCHJOURNEY

**दलित साहित्याचे विचार आणि दिशा :**

दलित साहित्याने विषय समाजव्यवस्था आणि कलानिर्मिती याबाबतही सखोल विचार करायला हवा. कारण दलित साहित्य हे विशिष्ट अशा जीवनवास्तवावर जाणीवपूर्वक भर देणारे असल्यामुळे वास्तवता आणि साहित्य यांचा परस्परसंबंधाचाही या साहित्याने अधिक खोलवर विचार केला पाहिजे. दलित जीवनातील वेदना, विद्रोहांना मुखर करते, त्याद्वारे जागृती घडवून आणणे, चेतावणी देणे, दलितांना 'स्व'चे भान असणे हे आपले नियम कर्तव्य असल्याचे दलित लेखक मानतात, म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथील विदर्भ साहित्य संघात केलेल्या एका भाषणात व्यक्त केलेले मनोगत लक्षात घेण्यासारखे आहे. मला साहित्यिकांना आवजुर्न सांगाचं आहे की, उदात्त जीवनमूल्ये आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कृत करा. आपलं लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. तिचा विस्तार होवू द्या.

आपल्या देशात उपेक्षितांच-दलिताचं फार मोठं जग आहे. हे विसरुन चालणार नाही. त्यांची व्यथा व दुःख समजून घ्या आणि त्याचे प्रतिबिंब आपल्या साहित्यात रेखाटा. दलित वर्गाविषयीची तळमळ अनेक दलित साहित्यिकांच्या निर्मितीतून ही व्यापक मानवतावादी जाणीव व्यक्त होते. उदा.नामदेव ढसाळ आपल्या 'गोलपिठा' या कविता संग्रहातून म्हणतात-

"नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करु नये |
लुटू नये, काळा-गोरा म्हणून नये, तू ब्राम्हण, तू क्षत्रीय,

तू वैश्य, तू शुद्र असे हिणवू नये.
एक तीळ सर्वांनी करडून खावा, माणसावरच सूक्त रचावे,
माणसाचेच गाणे गावे माणसाने."

तसेच फ.मु. शिंदे यांचे मत ही येथे लक्षात घ्यावे लागेल. ते म्हणतात, "मुक्ती लढयातून स्फुरलेले साहित्य किती अस्सल आहे, असतं हे दलित साहित्यातून दिसून येते. विश्वात्मकता हा साहित्याचा धर्म मानला तरी दलित साहित्यातील विश्वात्मकता भारतीय साहित्याला सापडणार नाही". हाही विचार भावी काळात प्रभावीपणे दलित साहित्याने आविष्कृत करावा.

आज समाजजीवन व राष्ट्रजीवन प्रगत होणारे साहित्य निर्माण होत नाही. आपल्या स्वतंत्र देशाला एकात्मतेची व बंधुत्वाची नितांत गरज आहे. म्हणून साहित्य कलेतून मानवतावादी शास्त्र निर्माण झाले पाहिजे. प्राचार्य, म.भि. चिटणीस म्हणतात त्याप्रमाणे, "भारतीय समाजाला नीतिमान बनविणे हे दलित साहित्याचे प्रयोजन असले पाहिजे. एकंदरीत मराठी साहित्यात निर्मिती करु इच्छिणाऱ्या दलित साहित्याने सर्वच मराठी साहित्य परंपरांचा डोळसपणे आणि पूर्वग्रहदूषित न होता नव्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्याची गरज आहे. दलित साहित्याने व्यापक दृष्टीकोन बाळगावा.

**संदर्भ :**

१) दलित साहित्य : काही विचार आणि दिशा - डॉ.प्रकाश कुमार
२) मराठी साहित्यातील स्पंदने - गो.म.कुलकर्णी